लोकमत, गुरूवार, दि.२२ नोव्हेंबर २०१२ HELLO सातारा

# शिवकृपा पतपेढीचा आज तिसावा वर्धापनदिन

## शाखांची संख्या १०० नेण्याचा संकल्प : भोसले

**कोरेगाव** | दि. २१ (प्रतिनिधी)

'**महाराष्ट्राच्या** सहकार चळवळीत आदर्शवत काम करणारी शिवकृपा सहकारी पतपेढी दि. २२ नोव्हेंबर रोजी तिसावा वर्धापनदिन साजरा करत आहे,' अशी माहिती अध्यक्ष अविनाश भोसले यांनी दिली. तीस वर्षांच्या वाटचालीच्या अनुषंगे शाखांची संख्या १०० वर नेण्याचा संकल्प असल्याचे त्यांनी सांगितले.

१९८२ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेच्या संपूर्ण महाराष्ट्रात ६३ शाखा व ५ विभागीय कार्यालये स्वमालकीच्या



**अविनाश भोसले**



**हणमंत गायकवाड**

जागेत आहेत. संस्थेचा एकूण व्यवसाय १२८५ कोटींचा असून ठेवी ७०७ कोटी तर कर्जे ५७८ कोटींच्या आहेत. संस्थेचा मार्च २०१२ अखेर ढोबळ नफा ६ कोटी रुपये आहे.

शिवकृपा पतपेढी विविध संस्था आणि सहकार खात्यामार्फत विविध पुरस्काराने सन्मानित झाली आहे. २००९ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचा सर्वोत्कृष्ट आदर्श पतसंस्था पुरस्कार, २००१ ते २००६ या कालावधीत अहवाल स्पर्धेत मुंबई पूर्व उपनगरे फेडरेशनचा पुरस्कार, राष्ट्रीय सहकाराकरिता विकास प्रबंधन संस्था वर्धा यांचा २००४-०५ यावर्षी अत्युत्कृष्ट संस्था पुरस्कार, २०१०-११ मुंबई विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशनचा आदर्श पतसंस्था पुरस्कार आयुक्त मधुकर चौधरी यांच्या हस्ते मिळाला आहे.

संस्थेच्या गौरवशाली वाटचालीत उपाध्यक्ष हणमंत गायकवाड, मानद सचिव पंढरीनाथ भोसले, संस्थापक संचालक कृष्णा शेलार, चंद्रकांत वंजारी, संचालक सखाराम संकपाळ, वसंतराव चव्हाण, भीमराव बोराडे, सोपान बोराडे, बाळासाहेब मोहिते, जयवंत खामकर, अशोक तुपे, बबन काटे, अशोक शिंदे, शिवाजी वरुडे, अॅड. अशोक शिंदे, संचालिका निर्मला ऐवळे, उषा जाधव, कर्मचारी प्रतिनिधी सुनील जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी पांडुरंग घाडगे, अधिकारी, कर्मचारी व ठेव प्रतिनिधी यांचे भरीव योगदान आहे.